## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ५

सभावृत्तांत

दिनांक ०७/०८/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑगस्ट महिन्याची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/०८/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| २. | मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ५. | मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्या |
| ६. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्य |
| ८. | मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| १०. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्य |
| ११. | मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

----------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. गट्टुवार, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, मा. डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. रत्नपारखी, मा. विनय ओहोळ, मा. एल.बी. जाधव, उपअभियंता स्थापत्य, मा. रवींद्र पवार, उप अभियंता,जलनि:सारण, मा. अनघा पाठक,उपअभियंता, झो.नि,पू., मा. अजय जाधव, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. विश्वास गेंगजे. क्रीडा अधिकारी, मा. मा.बी.एम. मुलाणी, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. मुठाळ सी.एल., मा. आर.बी. जगताप,कनिष्ठ अभियंता,नगररचना,मा. डी. के. बैचे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. जी.आर. गोसावी, सहा. उद्यान अधिक्षक, मा.सोनवणे ए.सी., मा. चौहान एस.एच., मा. कोतवडेकर एस.पी., मा. पाटील एस.ए., मा. सौदाई, आरोग्य निरीक्षक, मा.चौधरी, सर्व्हेअर, नगररचना मा.एम.एस.कदम, मा. एच. पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, मा. अमर मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मा. ड प्रभाग सभापती श्री. टाक तब्येत बरी नसल्याचे कारणास्तव सभेस हजर नसलेने प्रथम आजच्या सभेचे सभापती पद कोणी स्वीकारावे याबाबत सभागृहास विनंती केली.

**मा. सुनिता वाघेरे** : मा. सदस्य ड प्रभाग समिती श्री. रामदास बोकड यांनी सभेचे सभापती पद स्वीकारावे अशी सूचना मांडते.

**मा. आरती चौंधे** : मा. सुनिता वाघेरे यांनी मांडलेल्या सूचनेस अनुमोदन देत आहे.

मा. रामदास बोकड यांनी सभापतीपद स्वीकारले.

**मा. रामदास बोकड** : आजचे बैठकीचे सभापती म्हणुन संधी दिल्याबद्दल सहकारी नगरसेवक व नगरसेविका यांचे आभार मानुन बैठकीचे कामकाज सुरु करतो.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ४ दिनांक ०३/०७/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा.** सभापती : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ४ दिनांक ०३/०७/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १**:- प्रभाग क्र. ५६ वैदुवस्ती येथे सुदर्शननगर रस्ता क्र. २ येथे " प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, राजयोग मेडिटेशन सेंटर, सुदर्शननगर पिंपळे गुरव पुणे ६१" असा दिशादर्शक फलक महापालिकेच्या वतीने लावणेबाबत

**विषय क्र. २:-** जवळकर नगर मध्ये सोफोश धडफळे सेंटर(तारा), ८६/२अ जवळकर नगर,पिंपळे गुरव पुणे ६१ येथे जाणेसाठी नागरीकांना पत्ता मिळत नसल्याने जवळकर नगर, पारीजात कॉलनी येथे बीआरटी रस्त्याच्या जवळ "सोफोश धडफळे सेंटर(तारा), ८६/२अ जवळकर नगर,पिंपळे गुरव पुणे ६१" असा दिशादर्शक फलक महापालिकेच्या वतीने लावणेबाबत

**विषय क्र. ३**:- वैदुवस्ती येथील माजी नगरसेवक राजू लोखंडे यांचे घरासमोर सन १९९४ पासुनचे सार्वजनिक शौचालय आहे . त्याची अवस्था बिकट असुन सदर शौचालय व कचराकुंडीपासुन शेजारी राहणा-या नागरीकांचे आरोग्यास धोका असुन त्वरीत सदर शौचालय व कचराकुंडी हलविणेबाबत

**विषय क्र. ४ :-** प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर रहाटणी येथे गाव मौजे रहाटणी ,ता. हवेली,जि. पुणे येथील सर्व्हे नं. ४२,४५, ४९ मधुन १८ मीटर पासुन जाणारा कलम २०५ अन्वये ९ मीटरचा रस्ता घोषित केलेला आहे. परंतु त्या रस्त्यात गेली २५-३० वर्षापासुन दोन ते तीन मजली पक्की बांधकामे झालेली आहेत. सदरचा रस्ता हा दक्षिण उत्तर आहे आणि सदर भागात पुर्व- पश्चिम जाणारे प्लॉटींगचे रस्ते, ड्रेनेज,विद्युत, केबल, स्ट्रीट लाईट, पाण्याची पाईपलाईन, डांबरी रस्ते झालेले आहेत. सदर ९ मीटर घोषित केलेल्या रस्त्याची तेथील नागरीकांना काही एक गरज नाही. या उलट सदरचा रस्ता केल्याने ब-याच कुटुंबांचा प्रपंच उध्वस्त होऊन ते बेघर होतील शिवाय राष्ट्रीय संपत्तीचे कोटयावधी रुपयांचे नुकसान होईल. तरी रहाटणी येथील सर्व्हे नं. ४२,४५, ४९ मधुन १८ मीटर पासुन जाणारा कलम २०५ अन्वये घोषित असलेला ९ मीटर रुंदीचा रस्ता रद्द करणेबाबत

सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ०७/०८ /२०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. १६ | विषय क्र. १
दिनांक : ०७ /०८/२०१५ | विभाग : स्थापत्य विभाग
सुचक : मा. वैशाली राहूल जवळकर | अनुमोदक : मा. रामदास बोकड

संदर्भ : मा. वैशाली राहूल जवळकर यांचेकडील दिनांक ०७ /०८ /२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५६ वैदुवस्ती येथे सुदर्शननगर रस्ता क्र. २ येथे " प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, राजयोग मेडिटेशन सेंटर, सुदर्शननगर पिंपळे गुरव पुणे ६१" असा दिशादर्शक फलक महापालिकेच्या वतीने लावणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. १७ | विषय क्र. २
दिनांक : ०७ /०८/२०१५ | विभाग : स्थापत्य विभाग
सुचक : मा. वैशाली राहूल जवळकर | अनुमोदक : मा. रामदास बोकड

संदर्भ : मा. वैशाली राहूल जवळकर यांचेकडील दिनांक ०७ /०८ /२०१५ रोजीचा प्रस्ताव

जवळकर नगर मध्ये सोफोश धडफळे सेंटर(तारा), ८६/२अ जवळकर नगर,पिंपळे गुरव पुणे ६१ येथे जाणेसाठी नागरीकांना पत्ता मिळत नसल्याने जवळकर नगर, पारीजात कॉलनी येथे बीआरटी रस्त्याच्या जवळ "सोफोश धडफळे सेंटर(तारा), ८६/२अ जवळकर नगर,पिंपळे गुरव पुणे ६१" असा दिशादर्शक फलक महापालिकेच्या वतीने लावणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. १८ — विषय क्र. ३

दिनांक : ०७ /०८/२०१५ — विभाग : स्थापत्य विभाग/ आरोग्य विभाग

सुचक : मा. रामदास बोकड — अनुमोदक : मा. वैशाली राहूल जवळकर

संदर्भ : मा. रामदास बोकड यांचेकडील दिनांक ०७ /०८ /२०१५ रोजीचा प्रस्ताव

वैदुवस्ती येथील माजी नगरसेवक राजू लोखंडे यांचे घरासमोर सन १९९४ पासुनचे सार्वजनिक शौचालय आहे . त्याची अवस्था बिकट असुन सदर शौचालय व कचराकुंडीपासुन शेजारी राहणा-या नागरीकांचे आरोग्यास धोका असुन त्वरीत सदर शौचालय व कचराकुंडी हलविणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

ठराव क्र. १९ — विषय क्र. ४

दिनांक : ०७ /०८/२०१५ — विभाग : स्थापत्य विभाग/नगरररचना विभाग

सुचक : मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे — अनुमोदक : मा. कैलासभाऊ गबाजी थोपटे

संदर्भ : मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे यांचेकडील दिनांक ०७ /०८ /२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५५ पिंपळे सौदागर रहाटणी येथे गाव मौजे रहाटणी ,ता. हवेली,जि. पुणे येथील सर्व्हे नं. ४२,४५, ४९ मधुन १८ मीटर पासुन जाणारा कलम २०५ अन्वये ९ मीटरचा रस्ता घोषित केलेला आहे. परंतु त्या रस्त्यात गेली २५-३० वर्षापासुन दोन ते तीन मजली पक्की बांधकामे झालेली आहेत. सदरचा रस्ता हा दक्षिण उत्तर आहे आणि सदर भागात पुर्व- पश्चिम जाणारे प्लॉटींगचे रस्ते, ड्रेनेज,विद्युत, केबल, स्ट्रीट लाईट, पाण्याची पाईपलाईन, डांबरी रस्ते झालेले आहेत. सदर ९ मीटर घोषित केलेल्या रस्त्याची तेथील नागरीकांना काही एक गरज नाही. या उलट सदरचा रस्ता केल्याने ब-याच कुटुंबांचा प्रपंच उध्वस्त होऊन ते बेघर होतील शिवाय राष्ट्रीय संपत्तीचे कोटयावधी रुपयांचे नुकसान होईल. तरी रहाटणी येथील सर्व्हे नं. ४२,४५, ४९ मधुन १८ मीटर पासुन जाणारा कलम २०५ अन्वये घोषित असलेला ९ मीटर रुंदीचा रस्ता रद्द करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

**मा. सुनिता वाघेरे :-** मा. अध्यक्ष मागील बैठकीमध्ये ज्या विषयांवर चर्चा झाली त्या विषयांवर मागील एक महिन्यात कार्यवाही करण्यात आली याची माहिती विभागप्रमुखांकडून घेणेबाबत ठरले होते. त्यानुसार मागील प्रभाग समितीमध्ये चर्चिलेल्या विषयांवर आढावा घेणेत यावा. तसेच या पूर्वी प्रभाग समिती बैठकीमध्ये झालेल्या टॉयलेट ब्लॉक पाडणेबाबत जे ठराव पारीत करण्यात आले आहेत त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नाही. स्थापत्य विभागाकडून याबाबत माहिती देणेत आलेली नाही.

**मा. सभापती** :- मागील बैठकीमध्ये चर्चिलेल्या विषयांबाबत आढावा घेणेत यावा.

**आरोग्य विभाग :**

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील बैठकीचे वेळी मा. नीता पाडाळे यांनी आरोग्य विभागाकडील कचरा गाडयांचे नियोजन, औषध फवारणी, फॉगिंगचे कामे व्यवस्थित होत नसलेबाबत सांगितले होते.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** :- मागील बैठकीत झालेल्या चर्चेस अनुसरुन कचरा गाडयांचे नियोजन तसेच औषध फवारणी इ. कामांचे नियोजन करणेत आलेले आहे.

**मा. नीता पाडाळे** :- आरोग्य विभागाकडील कचरा गाडयांचे नियोजन, औषध फवारणी, फॉगिंगचे कामे व्यवस्थित होत आहे. धुराच्या गाडीचे जे वेळापत्रक केले आहे त्या प्रमाणे संपुर्ण वॉर्ड एका ट्रीपमध्ये पुर्ण होणे अवघड आहे.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** :- संपूर्ण वॉर्डमध्ये एकाच वेळी धुरीकरण होणेचे दृष्टीकोनातुन एकाच वेळी दोन वाहनांवर दोन मशिन ठेवुन प्रायोगिक तत्वावर काम सुरु करु असे सांगितले.

**मा. कैलासभाऊ थोपटे : -** नागरीकांकडून कचरा घेताना कचरागाडी कर्मचारी व्यवस्थित कच-यासाठी पुरविणेत आलेल्या डस्टबीन उचलुन घेत नाहीत व नागरीकांशी वर्तन योग्य नसते. अशा कर्मचा-यांना सदर काम देणेत येऊ नये.

**मा.सहा. आरोग्याधिकारी** :- संबंधितांना सूचना देणेत येतील.

**मा. राजेंद्र जगताप** :- आरोग्य विभागाचे कर्मचा-यांना वैद्यकीय विभागाकडे अतिरिक्त कामासाठी पाठविण्यात येऊ नये. यशवंतराव चव्हाण रुग्णालय येथे बरेच कर्मचारी उपलब्ध असतात परंतु ते अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी असलेचे सांगणेत येते. आरोग्य विभागाच्या कर्मचा-यांना वैद्यकीय विभागाकडील कामकाजासाठी पाठविणेत येवू नये तसे मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना कळवावे.

**पशूवैद्यकीय विभाग**

**मा. राजेंद्र जगताप** :- पिंपळे गुरव परिसरात मोकाट कुत्र्यांचे प्रमाण वाढत आहे.

**मा. पशू वैद्यकीय अधिकारी** :- १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत तीन संस्थांचे काम सुरु होणार आहे त्यानंतर दोन प्रभागांसाठी एक संस्था कार्यरत असेल व महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील एक गट(टीम) अशी यंत्रणा प्रभागांसाठी राहील. अशा प्रमाणे दोन गाडया प्रभागासाठी उपलब्ध राहतील.

**विद्युत विभाग**

**मा. कैलासभाऊ थोपटे** :- विद्युत विभागाचे वीजतंत्री कर्मचा-यांची कामाची वेळ बदलली आहे. त्यामुळे रात्री १० नंतर विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास कोणीही वीजतंत्री येत नाहीत.

**मा. सभापती** : कार्यकारी अभियंता विद्युत यांनी उत्तर द्यावे.

**मा. कार्यकारी अभियंता श्री. चव्हाण** : कर्मचा-यांचे कामकाजाच्या वेळा बदलण्याबाबत निर्णय प्रायोगिक तत्वावर घेणेत आला आहे. सदर बाबत दिनांक १३/८/२०१५ रोजी निर्णय घेणेत येणार आहे.

**मा. निता पाडाळे** :- सी.सी. टीव्ही कॅमेरे बसविण्याबबातची माहिती द्यावी. सदर सुविधा महापालिका शाळा, चौक अशा ठिकाणी बसविणे आवश्यक आहे.

**मा. कार्यकारी अभियंता, विद्युत** :- सदर काम सह शहर अभियंता (वि/यां) यांचे अधिपत्याखाली चालते. यामध्ये पोलीस आयुक्त यांचा सहभाग असतो व शक्य तो पोलीस चौक्यांच्या कनेक्टिव्हीटीमध्ये सदर यंत्रणा उभारणेत येते. याबाबतची विस्तृत माहिती सह शहर अभियंता (वि/यां) यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

**मा.निता पाडाळे** :- पुढील प्रभाग समिती सभेस सह शहर अभियंता (वि/यां) यांना बोलवावे.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे** :- ड प्रभाग समिती सदस्यांची सदर विषयीची मागणी कार्यकारी अभियंता विद्युत यांनी सह शहर अभियंता (वि/यां) यांचेकडे कळवावी.

**मा. सुनिता वाघेरे** :- प्रभाग क्र. ४४ मधील ट्रान्सफॉर्मर हलविणेबाबतची कार्यवाही विद्युत विभागाने अद्याप पूर्ण केलेली नाही. याकामी दोन वेळा नगररचना विभागाने डीमार्केशनची कार्यवाही पूर्ण करुन दिलेली असतानाही सदर कार्यवाही विद्युत विभागाकडुन प्रलंबित आहे.

**मा. कार्यकारी अभियंता विद्युत** :- सदर प्रकरणी वरिष्ठ पातळीवर निर्णय घेणेत येणार आहे.

**<u>पाणीपुरवठा विभाग:</u> -**

पाणीपुरवठा विभागाचे कामकाजास अनुसरुन कार्यकारी अभियंता व उपअभियंता हे बैठकीस उपस्थित राहत नसलेबाबत सर्वच सभासदांनी नाराजी व्यक्त केली.

**मा.सभापती** : पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता हे पुढील बैठकीस उपस्थित राहिले नाहीत तर त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करावी.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम** : -मागील सभेमध्ये उपस्थित केलेनुसार रामनगर येथील पाणीपुरवठा ठीक आहे.

**<u>अतिक्रमण विभाग</u>**

**मा. अनिता मच्छिंद्र तापकीर** : - अतिक्रमण विभागाचे कामकाज नि:पक्षपातीपणे करणेत यावे.

**मा. कैलासभाऊ थोपटे** :- सदर कारवाईची वेळ वाढवावी. अतिक्रमण करणा-यास काही दुकानदार जागा देतात त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. मा. सुनिता वाघेरे यांनीही अतिक्रमण करणा-यास जागा देणारे दुकानदार यांचेवर दंडात्मक कारवाई करावी असे मत व्यक्त केले.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे** :- अतिक्रमण कारवाई सुसुत्रितरित्या होत नाही.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव , सभा शाखा** :- अतिक्रमण विभागाचे कामकाजाची वेळ मा. आयुक्त सो. यांचेकडील दिनांक ३/८/२०१५ रोजीचे आदेशानुसार दिनांक ४/८/२०१५ पासुन दुपारी १ ते ९ अशी करण्यात आली आहे. सदर आदेश पोलीस कर्मचा-यांना अद्याप दिलेले नाहीत. त्यामुळे प्रभावीपणे अतिक्रमणांवर कारवाई करण्यास अडथळा निर्माण होत आहे. तरी सुध्दा ड क्षेत्रिय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाने माहे जुलै २०१५ मध्ये ७० हातगाडया जप्त करुन गोडाऊनमध्ये जमा केलेल्या आहेत. माहि एप्रिल २०१५ पासुन १०८ हातगाडया, ५० टप-या, २२ टेंपो, ६२ पथारीवाले यांचेवर कारवाई करण्यात आली असुन एकूण दंड र.रु. ७८०००/- मनपा कोषागरात भरण्यात आला आहे. ज्या हातगाडीधारकांनी हॉकर्स झोनमध्ये नाव नोंदणी केलेली आहे परंतु ते रस्त्यावर अतिक्रमण करताना आढळतात त्यांना दंड आकारण्यात येत नाही. भूमि जिंदगी विभागाने हॉकर्स झोनमध्ये नोंद केलेल्या व्यवसायिकांच्या बाबत बायोमेट्रीक पध्दतीने सर्व्हेक्षण करणेचे कामकाज एका एजन्सीद्वारे सुरु केले आहे. त्यानंतर हॉकर्स झोन बाबत ची पुढील कार्यवाही सुरु होईल.

**<u>अनधिकृत बांधकामे व स्थापत्य विभाग</u>** :-

**मा. राजेंद्र जगताप** :- प्रभाग क्र. ५७ येथील १८ मीटर रस्त्यांच्या साईट पट्टयांमधील बांधकामांबाबत अद्याप कार्यवाही प्रलंबित आहे. अनधिकृत टप-यांचे प्रमाण वाढले आहे. नव्याने बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग सुरु करण्यात आला आहे. अनधिकृत नळकनेक्शन अधिकृत करणेसाठी नागरीकांना ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागते. सदर कामी अनधिकृत बांधकाम असल्यास शास्तीकर भरुन नंतरच प्रकरण सादर करावे लागते. तसेच मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणेच्या दृष्टीकोनातुन महापालिकेचे बॅडमिंटन हॉल, जलतरण तलाव,जिम्नॅशियम हॉल भाडयाने देणे बाबत योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा. सचिव सभा शाखा** :- मा. अनिता तापकीर यांनी मागील बैठकीत व्होडाफोन केबलचे कामामुळे रस्ता खराब झाल्याचे निदर्शनास आणुन दिले होते.

**मा. सभापती** :- कार्यकारी अभियंता स्थापत्य यांनी उत्तर द्यावे

**मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री.ओंभासे :-** व्होडाफोन कंपनीने रस्ता खोदाईचे कामास अनुसरुन र.रु. १.६६ कोटी महापालिकेकडे भरलेले आहेत . सदर तरतुद प्रभागातील कामासाठी वापरण्यात येणार आहे. सदर बाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

**मा. सभापती :-** सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठकीमध्ये झालेल्या विविध विषयांवरील चर्चेस अनुसरुन खालील प्रमाणे सूचना केल्या.

विद्युत विभागाने वीजतंत्री व इतर कर्मचा-यांचे दोन शिफ्टमध्ये कामकाज वाटप करावे

मा. सुनिता वाघेरे यांचे प्रस्तावाबाबत स्थापत्य विभागाने आवश्यक ती कार्यवाही करणे

पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता वा उपअभियंता यांचेपैकी एका अधिका-याने बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक

अतिक्रमण विभागाने अतिक्रमण करणा-या गाडयांचे लायसन्स चेक करणे

**मा. सभापती** : बैठकीचे शेवटी मा. महापौर व सदस्या ड प्रभाग समिती श्रीमती शकुंतलाताई भाऊसाहेब धराडे यांच्या सासुबाई श्रीमती सखुबाई धराडे, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. कलाम यांचे यांचे व मनपा कर्मचारी श्री. विजय गायकवाड यांचे दु:खद निधन झालेचे कारणास्तव सभागृहातील सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहणेत यावी.

**सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून मयत** श्रीमती सखुबाई धराडे, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. कलाम यांचे यांचे व मनपा कर्मचारी श्री. विजय गायकवाड यांना श्रध्दांजली वाहिली.

**मा. सभापती :- माहे ऑगस्ट २०१५ ची मासिक सभा संपली असे जाहीर करतो.**

सही/-
(रामदास गेणभाऊ बोकड)
**सभाध्यक्ष**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/८४ /२०१५
दिनांक – २५ /०८/२०१५